महाराष्ट्र वन विभाग

Phone No: 02363/ 272005
Email ID:dcfsawantwadi@gmail.com

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**उपवनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग यांचे कार्यालय**
**वन भवन सालईवाडा, सावंतवाडी, पिन कोड ४१६ ५१०, जि. सिंधुदुर्ग**

जा. क्र. ब/ नोसेल कक्ष/नि.पा.प्र./२०२२-२३/ १७६७
सावंतवाडी ४१६ ५१०, दि. ३० .११.२०२२

प्रति,

कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग, ओरोस, सिंधुदुर्ग

**विषय-** **वन जमीन- सिंधुदुर्ग**
लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी मौजे निरुखे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबत

**संदर्भ-** १. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एफएलडी-२०२२/ प्र. क्र. २८५/फ-१०, दि. १७.११.२०२२
२. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्र. लपाविओ/ प्रशा-२/२९८७/२०२२, दिनांक २२.११.२०२२

निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्पकामी मौजे निरुखे, ता. कुडाळ येथील 18.94 हे. आर वनक्षेत्र वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव विहीतमार्गाने शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावातील वळतीकरण करावयाच्या क्षेत्रासंबंधी शासनाने संदर्भ क्रमांक 1 अन्वये दोन मुद्दे उपस्थित करुन त्या संदर्भातील माहिती मागणी केली आहे. त्या अनुषंगाने आपले विभागाशी संबंधित असलेल्या माहितीचे पत्र संदर्भ क्रमांक 2 अन्वये इकडील कार्यालयास सादर केले आहे. सदर पत्रातील माहितीचे अवलोकन करता, प्रस्तुत मुद्याची माहिती अत्यंत त्रोटक व मोघम स्वरुपात स्वरुपात सादर केलेचे दिसून येते.

यास्तव शासनाने संदर्भ क्रमांक 1 अन्वये मुद्दा क्रमांक 2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे **'खाजगी हक्कधारकांना प्रचलित नियमानुसार मोबदला देण्यासंदर्भातील प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र व खाजगी व्यक्तींचे सहमतीपत्र'** या संदर्भातील परिपूर्ण माहिती इकडील कार्यालयास सादर करावी. जेणेकरुन प्रस्तुत विषयाचा पूर्तता अहवाल शासनास तात्काळ सादर करता येईल.

**(एस. नवकिशोर रेड्डी)**
**उपवनसंरक्षक**
**सावंतवाडी वन विभाग सावंतवाडी**

प्रत- मा. मुख्य वनसरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.